# १३. अनाम वीरा...

• ऐका. वाचा. म्हणा.

अनाम वीरा जिथे जाहला तुझा जीवनान्त
स्तंभ तिथे ना कुणी बांधला, पेटली न वात !


धगधगतां समराच्या ज्वाला या देशाकाशीं
जळावयास्तव संसारातुन उठोनिया जाशी !

मूकपणाने तमी लोपती संध्येच्या रेषा —
मरणामध्ये विलीन होसी, ना भय ना आशा !

जनभक्तीचे तुझ्यावरी नच उधाणले भाव
रियासतीवर नसे नोंदले कुणी तुझे नाव !


जरी न गातिल भाट डफावर तुशें यशोगान !
सफल जाहले तुझेच हे रे तुझेच बलिदान !

काळोखातुनि विजयाचा ये पहाटचा तारा
प्रणाम माझा पहिला तुजला मृत्युंजय वीरा !



**कुसुमाग्रज** –विष्णू वामन शिरवाडकर (१९१२-१९९९) : ज्ञानपीठ पारितोषिक विजेते प्रसिद्ध लेखक, कवी, नाटककार. 'जीवनलहरी', 'विशाखा', 'समिधा', 'स्वगत', 'हिमरेषा', 'वादळवेल', 'मारवा', किनारा' इत्यादी काव्यसंग्रह; 'वैजयंती', 'राजमुकुट', 'कौंतेय', 'नटसम्राट', 'वीज म्हणाली धरतीला', 'विदूषक' इत्यादी नाटके प्रसिद्ध.

प्रस्तुत कवितेत कवीने देशाच्या सीमेवर शत्रूशी लढणाऱ्या, वेळप्रसंगी प्राणार्पण करून देशाचे रक्षण करणाऱ्या ज्ञात-अज्ञात सैनिकांना अभिवादन केले आहे.



**प्र. १. कवींनी असे का म्हटले असावे, असे तुम्हांला वाटते ?**

(अ) स्तंभ तिथे ना कुणी बांधला, पेटली न वात !

(आ) जळावयास्तव संसारातुन उठोनिया जाशी !

(इ) सफल जाहले तुझेच हे रे तुझेच बलिदान !

**प्र. २. खालील आकृती पूर्ण करा.**

**देशासाठी प्राणार्पण केलेला सैनिक ‘अनाम’ राहिला आहे, असे कवींना वाटते, त्याची कारणे लिहा.**

→

→

→

→

→

**प्र. ३. खालील जोड्या जुळवा.**

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| (१) धगधगतां समराच्या ज्वाला | (अ) शांतपणे मरण स्वीकारणे |
| (२) मरणामध्ये विलीन | (आ) निर्भयपणे, मनात कोणतीही आसक्ती न ठेवता |
| (३) ना भय ना आशा | (इ) भावना व्यक्त न करणे |
| (४) नच उधाणले भाव | (ई) महाभयंकर युद्ध |

**प्र. ४. खालील शब्दांचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

(१) अनाम वीरा-

(२) जीवनान्त-

(३) संध्येच्या रेषा-

(४) मृत्युंजय वीर-



## लिहिते होऊया.

- **तुम्ही कोण होणार, ते ठरवा. त्यासंबंधित खाली काही प्रश्न दिले आहेत, त्यांवर विचार करा. त्या प्रश्नांची उत्तरे तयार करून त्यांचे सलग लेखन करा.**

**मी.......... होणार!**

↑ मी...... व्हायचे का ठरवले आहे ?

← मी ...... बनल्यानंतर भविष्यात काय काय करणार आहे ?

→ मी...... होण्याबाबत माझ्या कुटुंबातील सदस्यांची काय मते आहेत ?

↓ ......होण्यासाठी मी काय प्रयत्न करणार आहे ?

## म्हणी ओळखूया.

- **खालील वाक्ये वाचा. वाक्याच्या अर्थानुसार योग्य म्हण लिहा.**

(१) गणपतरावांकडे जोपर्यंत प्रतिष्ठेचे पद होते, धनसंपत्ती होती, तोपर्यंत त्यांच्याकडे येणाऱ्या पैपाहुण्यांचा राबता होता. जसे ते सेवानिवृत्त झाले, तसा माणसांचा वावर कमी झाला आहे, म्हणतात ना.......

(२) रेहानाची कंपासपेटी हरवली, तिने ती घरभर शोधली. शेजारीपाजारीही जाऊन पाहिले; पण कंपासपेटी कोठेच नव्हती. शेवटी ती रेहानाच्याच दप्तरातच सापडली, म्हणतात ना.......

(३) पावसात भिजणाऱ्या कावळ्याने ठरवले, पावसाळा संपला, की घर बांधायचे. पावसाळा संपला, पण इकडे तिकडे फिरण्यात तो विसरून गेला. पुन्हा पावसाळा आला. पावसात भिजताना त्याला आठवले, की आपण घर बांधायचे ठरवले होते, म्हणतात ना.......

(४) फर्नांडिस खूप बुद्धिमान व प्रसंगावधानी म्हणून प्रख्यात होते. त्यांचा मुलगा फिलिप जसजसा मोठा होऊ लागला, तसतसे त्याच्यात हे गुण दिसू लागले. गावातले सगळे म्हणू लागले,.......



## वाचा व लिहा.

- **खालील उतारा वाचा. विरामचिन्हांचा योग्य वापर करून उतारा पुन्हा लिहा.**

मुलांनो शाळेत तुम्हांला अनेक मित्र असतात तुमची काळजी घेणारे तुमचे आरोग्य जपणारे असे अनेक मित्र तुमच्या सभोवती आहेत कोण बरे आहेत हे मित्र असा प्रश्न तुम्हांला निश्चितच पडेल आपल्याला फळे फुले सावली देणारे वृक्ष आपल्याला पिण्यासाठी पाणी देणाऱ्या नद्या श्वसनासाठी ऑक्सिजन देणारी हवा आपण ज्यावर निवांतपणे राहतो अशी जमीन अर्थातच आपल्या सभोवतालचा निसर्ग हाच आपला खरा मित्र आहे

## आपण समजून घेऊया.

- **वाक्य म्हणजे काय?**

संपूर्ण अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दसमूहाला **वाक्य** म्हणतात. वाक्याचे दोन भाग असतात. ज्याच्याविषयी सांगायचे ते **उद्देश्य** आणि जे सांगायचे ते म्हणजे **विधेय**.

'त्याचा मोठा मुलगा दररोज आगगाडीने मुंबईला जातो.'

या वाक्यात मुलाविषयी सांगायचे आहे, म्हणून 'मुलगा' हे उद्देश्य, तर 'जातो' हे विधेय आहे. या वाक्यातील 'त्याचा', 'मोठा' हे शब्द उद्देश्याचा विस्तार आहेत, तर 'दररोज', 'आगगाडीने' हे शब्द विधेयाचा विस्तार आहेत.

काही छोटी वाक्ये तयार करून त्यांतील उद्देश्य, विधेय ओळखा आणि त्यांचा विस्तार करता येतो का ते पाहा.

## हे करून पाहूया.

प्रत्येकाच्या अंगी काही कलाकौशल्ये असतात. त्या कलाकौशल्यांतून नवनिर्मिती होत असते. या कलाकौशल्यांतून आपल्याला आपले विचार व्यक्त करता येतात. असे विचार, कल्पना आपणांस चित्रांच्या साहाय्यानेही प्रकट करता येतात. चला पाहूया, ही अनोखी चित्रकला!





प्रत्येकाला चित्र काढायला आवडतं. जे काढावंसं वाटतं, ते रेखाटणं म्हणजे चित्र. चित्र दुसऱ्याला दाखवण्यासाठी असतं, असं मुळीच नाही. चित्र काढायचं ते आपल्या आनंदासाठी. अशी चित्रांची मौज अनुभवायची असेल, तर एक छानसा मार्ग म्हणजे भिंतीवरची चित्रं.

'कागदावरचं चित्र' हातांची बोटं आणि मनगट वापरून काढावं लागतं. कागदावरील चित्राचा आकार लहान असतो, त्यामुळे आकारबद्ध रेखाटन येणं हे एक कौशल्य आहे. ते सर्वांनाच प्राप्त होतं असं नाही; पण भिंतीवरच्या चित्राचं तसं नाही. भिंतीवरच्या चित्रासाठी खांद्यापासून हात हलवावा लागतो. त्यासाठी चित्र रेखाटण्याचं कौशल्य यायलाच पाहिजे, असं काही नाही, फक्त त्यासाठी चित्र रेखाटणाऱ्या गटाचं पूर्ण नियोजन पाहिजे.

भिंतीवरचं चित्र कसं काढायचं? अगदी सोपं आहे. एखादं सोपं चित्र निवडायचं. त्यात रंग कोणते भरायचे, त्या रंगांचं मिश्रण कसं तयार करायचं ते निश्चित करायचं. उदा., आपण भिंतीवर झाडं, पानं, फुलं, डोंगर, पक्षी, सूर्य असं निसर्गचित्र काढायचं ठरवलं, तर आधी पार्श्वभूमी रंगवून घ्यायची. नंतर संपूर्ण भिंतीला फिकट रंग द्यायचा. झाडाचा आकार काढून घ्यायचा. प्रत्येक चित्राची जागा ठरवून घ्यायची. मग त्या रंगवलेल्या भिंतीवर ठरवलेल्या चित्राच्या बाह्यरेषा काढायच्या. त्यात रंग भरायचे. रंगकाम करताना गडद, विरोधी रंग वापरायचे म्हणजे चित्र आकर्षक दिसतं. सगळ्यांत शेवटी चित्रातील बारकावे रंगवायचे.

## लिहिते होऊया.

- **तुम्हांला काय करायला आवडते ते सांगा. त्यासंबंधी खाली काही प्रश्न दिले आहेत. त्यांवर विचार करा व लिहा.**

  (अ) तुमचा आवडता छंद कोणता? त्यासाठी तुम्ही दिवसभरात किती वेळ देता?

  (आ) तुमच्या आवडत्या छंदाबाबत तुमच्या घरातील व्यक्ती तुम्हांला कोणती मदत करतात?